सुलतानपूर येथील पुतळ्यांचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या निधीतून होणार सुशोभीकरण >>पान 2

मराठी माणसाचे अस्तित्व शहरात असावे : राज ठाकरे >>पान 3

जलजीवन मिशनचे माहिती फलक झाले अदृश्य >>पान 4

सुविचार

सातत्याने प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



अंकिता वालावलकरने घेतली राज ठाकरेंची भेट, शिवतीर्थावर जाऊन दिलं लग्नाचं निमंत्रण

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 173 ■ सोमवार, दि. 03 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## मंत्रालय प्रवेशासाठीच्या एफआरएस तंत्रज्ञानामुळे सुरक्षितता, पारदर्शकतेमध्ये होणार वाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयामध्ये प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या फेस डिटेक्शनवर आधारित एफआरएस तंत्रज्ञानामुळे मंत्रालयाच्या सुरक्षिततेमध्ये वाढ होण्याबरोबरच शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गती येण्यात मदत होणार आहे. शासकीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी या सर्वांनी या प्रणालीसाठीची आवश्यक नोंदणी करून घ्यावी, जेणेकरून सर्वांचा प्रवेश सुलभ होईल, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

या प्रणालीमुळे मंत्रालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची ओळख सुनिश्रि्चत होणार आहे. अनधिकृत प्रवेशाला चाप बसणार आहे. अनुचित प्रवेश रोखले जाणार असून त्यामुळे मंत्रालयाच्या सुरक्षिततेमध्ये वाढ होणार आहे. या तंत्रज्ञानामुळे अनधिकृत प्रवृत्तींनाही चाप बसणार आहे. यामुळे मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण येऊन शासकीय कामकाजात अधिक सुलभता आणि पारदर्शकता येऊ शकेल. या तंत्रज्ञानामुळे योग्य व्यक्तींना अधिकृतपणे प्रवेश मिळणार असून त्यामुळे लोकांची कामे जलद गतीने होण्यात मदत मिळणार आहे.

अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी यांच्या प्रवेशासाठी विविध सुविधा करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रवेशामध्ये अडचणी येणार नाहीत. तथापि, यासाठी सर्व संबंधितांनी फेस डिटेक्शनसंदर्भातील नोंदणी करणे आवश्यक राहील. सर्वांनी यासाठीची नोंदणी आणि फेस डिटेक्शन त्वरित करून घ्यावे.

अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या फेस रीडिंग संदर्भातील आवश्यक डेटा हा तातडीने अपलोड करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जेणेकरून फेस रीडिंग प्रणाली अपडेट होऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रवेश सुलभ होईल.

मंत्रालय सुरक्षेच्या अनुषंगाने मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांचे फेशियल रिकॉग्नीनेशन आणि आरएफआयडी कार्ड आधारित प्रवेश देण्यात येत आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त मंत्रालयातील १० हजार ५०० अधिकारी/कर्मचारी यांचा तपशिल सदर प्रणालीमध्ये सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने कार्यान्वयन कंपनीमार्फत सर्व प्रवेशद्वार येथे फेशियल रिकॉग्नीनेशन यंत्रणा प्रस्थापित करण्यात आली आहे. ही यंत्रणा ' गो लाईव्ह' करण्यात आली आहे. जानेवारी २०२५ पासुन मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांना फेशियल रिकॉग्नीनेशन व आरएफआयडी कार्ड आधारित प्रवेश देण्यात येत आहे.



मंत्रालय हे ठिकाण अत्यंत संवेदनशील व महत्त्वाचे असल्याने सदर आस्थापनेची सुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याअनुषंगाने मंत्रालय अंतर्गत सुरक्षा प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात आला आहे. सुरक्षा प्रकल्प हा एक आणि दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे. मंत्रालय परिसर एकात्मिक सुरक्षा आणि देखरेख अंतर्गत टप्पा २ हा प्रकल्प हा टप्पा एक या प्रकल्पाचा नैसर्गिक विस्तार म्हणून टप्पा २ प्रकल्प राबविण्यात येत आहे.

मंत्रालय सुरक्षा प्रकल्प टप्पा – २ मधील कामांचे कार्यान्वयन व वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच अभ्यांगताना तसेच क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना डिजी प्रवेश या प आधारीत ऑनलाईन प्रणालीमार्फत मंत्रालय प्रवेश सुनिश्र्चीत करण्यात येणारआहे.

## सर्व अमदारांसोबत चर्चा केली आहे. शक्तीपीठ महामार्गाला कोणाचाही विरोध नाहीय- देवेंद्र फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** मी सर्व आमदाराशी चर्चा केली विरोध बिलकुल नाहीं सर्व आमदारांना भेटलो आहे. विरोध मूठभर लोकांचा विरोध आहे. सर्व आमदारांनी शक्तिपीठाला समर्थन दर्शवीला आहे. कृती समितीला घेऊन देखील आमदार माझ्याकडे येऊन भेटणार आहेत अशी प्रतक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तीपीठ महामार्गावरून दिली आहे.

## व्यापाऱ्यास मारहाण करून लुटणाऱ्या तिघांना जळगाव शहर पोलिसांकडून अटक



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव रेल्वे स्थानकावर उतरलेल्या धुळे येथील शहीद मुन्ना कुरेशी या व्यापाऱ्यास तिघांनी मारहाण करून जबरदस्ती दुचाकीवर बसवले. त्यानंतर व्यापाऱ्यास भुसावळ रोडवरील गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेजजवळ नेऊन ऑनलाईन पद्धतीने २ हजार आणि खिशातील ३०० रुपये असे एकूण २३०० रुपये काढून घेतले. नंतर धमकी देत त्याच ठिकाणी सोडून पळ काढला. या प्रकरणी व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून जळगाव शहर पोलिसांनी यश पाटील, मनोज सोनवणे आणि महेंद्र पाटील या तिघां संशयित आरोपींना अटक केली आहे.

### जिल्ह्यात ३५ महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रास मान्यता

>>पान ४

# पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरी

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते मानाची गदा प्रदान

### राज्याच्या क्रीडा विकासासाठी शासन कटिबद्ध–उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या ६७ व्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताबासाठी झालेल्या लढतीत पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडचा पराभव करीत विजतेपद पटकाविले. स्पर्धेचा विजेता पृथ्वीराज मोहोळ याला उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते मानाची गदा प्रदान करण्यात आली. राज्यातील क्रीडा विकासाला चालना देताना प्रत्येक खेळासाठी आवश्यक आर्थिक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही श्री.पवार यांनी दिली.**



मॅट विभागात नांदेडचा (मूळचा पुण्याच्या राजगुरुनगरमधील राक्षेवाडीचा) डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे आणि पुणे जिल्ह्याचा पृथ्वीराज मोहोळ यांच्यात लढत झाली. यात पृथ्वीराज मोहोळ विजेता ठरला. माती विभागातून सोलापूर जिल्ह्याचा महेंद्र गायकवाड आणि परभणीचा साकेत यादव यांच्यात अंतिम लढत झाली. यात महेंद्र गायकवाड विजेता ठरला.

अहिल्यानगर येथील वाडिया पार्कमध्ये कै.बलभिम अण्णा जगताप क्रीडानगरीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार संग्राम जगताप, माऊली खटके, काशिनाथ दाते, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, राज्यातील क्रीडा रसिकांनी या स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला. स्पर्धेसाठी पारितोषिकेही मोठी ठेवण्यात आली आहेत. >>पान २

## फलटणमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला भगदाड पडणार, बड्या नेत्याची अजित पवारांच्या राष्ट्रवादीत घरवापसी होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर संजीवराजे निंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ सोडत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. मत्र, विधानसभेच्या निकालानंतर संजीवराजे निंबाळकर पुन्हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत घरवापसी करण्याच्या तयारीत आहे. शरद पवारांच्या पक्षांमध्ये प्रवेश करणारे संजीव राजे नाईक निंबाळकर पुन्हा एकदा अजित पवारांच्या पक्षात जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.




रामराजे यांचे चिरंजीव अनिकेत राजे नाईक निंबाळकरही अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार

संजीवराजे नाईक निंबाळकर हे रामराजे यांचे चुलत बंधू आहेत. फलटण तालुक्याचे राजकारण हे राजराजे यांच्या वतीने संजीवराजे नाईक निंबाळकर सांभाळतात असे बोलले जाते. लवकरच संजीवराजे नाईक निंबाळकर, राम राजे यांचे चिरंजीव अनिकेत राजे नाईक निंबाळकर आणि विश्वजीतराजे नाईक निंबाळकर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. भाजपचे नेते माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या त्रासाला कंटाळून संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता. आता पुन्हा एकदा संजीवराजे नाईक निंबाळकर शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांना साथ देणार असल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे.

>>पान २

## वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचा शाही विवाह सोहळा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा परंपरेनुसार श्री विठ्ठल सभा मंडप येथे संपन्न झाला.

सकाळी श्री विठ्ठल रुक्मिणीमातेला शुभ्र वस्त्र तसेच श्री.रुक्मिणी मातेस मोत्याचे दागिने, नथ आणि अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री. रुक्मिणी मातेच्या गर्भागृहातून गुलाल श्री.विठ्ठलाकडे नेण्यात आला. तिथे गुलालाची उधळण केल्यानंतर श्री विठ्ठलाचा गुलाल रुक्मिणी मातेकडे नेण्यात आला. तिथेही गुलालाची उधळण करण्यात आली.

दुपारी १२ वाजता श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेची पाद्यपुजा सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, संभाजी शिंदे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या शुभहस्ते पार पडली.

त्यानंतर श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची अलंकाराने सजवलेली उत्सवमूर्ती या विवाह सोहळय़ाच्या ठिकाणी म्हणजे श्री.विठ्ठल सभामंडपातील फुलांनी सजविण्यात आलेल्या शाही मंडपात आणण्यात आली. दोन्ही देवतास मुंडावळ्या बांधून आणल्या गेल्या. यानंतर अंतरपाट धरले आणि मंगलाष्टकास सुरवात झाली. त्यामध्ये मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंगलाष्टका म्हटली. मंगलाष्टक झाल्यावर सर्व उपस्थित भाविकांनी शाही विवाह सोहळा साजरा केला.




# सुलतानपूर येथील पुतळ्यांचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या निधीतून होणार सुशोभीकरण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** सुलतानपूर तालुका लोणार येथे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा निवडून आल्या बद्दल पहिल्यांदाच भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी येथिल तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा बसवण्यात यावा अशी मागणी केली होती त्या वेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की येथे लवकरच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवण्यात येईल असा निर्धार केला होता शब्द दिला होता त्यानुसार येथिल तरुण युवकांनी नागरिकांनी लोक वर्गणी जमा करून भव्य असा पुतळा बसविला त्यामुळे आज आमदार सिद्धार्थ खरात यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना हार अर्पण करून अभिवादन केले येथिल जागेची पाहणी केली व पुतळ्याचा चबुतरा व परिसराचे सुशोभीकरण व हाय मास्ट लाईट आमदार निधीतून दोन महिन्याच्या आत देण्यात येईल येईल असा शब्द दिला. आमदार सिद्धार्थ खरात हे शिव, शाहू, फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी विचारांचे पाईक व संत तुकाराम महाराज यांची वारकरी चळवळ बळकट करण्यासाठी संत महंत यांचे यांच्या विचाराचे पाईक आहेत त्यामुळे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिलेला शब्द ते प्रत्यक्षात कृतित आणतात.म्हणून छत्रपती शिवाजी महाराज व त्याच बरोबर डॉ बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ सुद्धा हायमास्ट लाईट देण्यात येईल व टप्याटप्याने येथिल नागरिकांच्या मागणी नुसार सभा मंडप व गावातील रस्ते नाल्यांचे कामे करण्यात येतील असेही आश्र्वासन आमदार सिद्धार्थ खरात यांनी या वेळी दिला.





यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप वाघ, सागर पनाड, बंडू जोगदंड (शहर प्रमुख शिवसेना सुलतानपूर),लालू भाई (युवासेना शहर प्रमुख सुलतानपूर) सुरज साठे, शंकर पंडित, अजय सुरुशे, नागेश सोनुने, रमेश भानापुरे, हर्षल इंगोले, शेख जावेद शेख , संतोष चेके, सुरज साठे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## १९ वर्षाखालील महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !

भारतीय पुरुषांचा क्रिकेट संघ इंग्लंड विरुद्ध टी २० मालिका खेळत आहे त्यामुळे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष त्या संघाकडे लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा १९ वर्षाखालील संघ मलेशियातील क्वालालंपूर येथे टी २० चा विश्र्वचषक खेळतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांची इंग्लंड विरुद्ध द्विपक्षीय मालिका चालू असताना भारत या मालिकेत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते मात्र मलेशियातील क्वालालंपूर येथे माहिलांचा १९ वर्षाखालील टी २० चा विश्र्वचषक चालू होता हे किती लोकांना माहीत होते ? याच विश्र्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी अजिंक्यपद मिळवून विश्र्वक्रिकेटवर आपली मक्तेदारी सिद्ध केली. क्वालालंपूरच्या बायुमास ओव्हल येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी जबरदस्त खेळ करत दक्षिण आफ्रिकन महिला संघाचा धुव्वा उडवत विश्र्वचषकावर भारताचे नाव कोरले. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी जबरदस्त गोलंदाजी करून दक्षिण आफ्रिकेला अवघ्या ८२ धावत गुंडाळून अवघ्या ११.२ षटकात ८४ धावा काढून ९ गडी राखत एकतर्फी विजय मिळवला. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी एकहाती वर्चस्व गाजवले. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय महिलांनी हुकूमत गाजवून दक्षिण आफ्रिकन महिलांना दाती तृण धरायला लावले. हा सामना जिंकून भारतीय महिलांनी सलग दुसऱ्यांदा विश्र्वचषकावर नाव कोरले. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे हे केवळ दुसरे विश्र्वविजेतेपद आहे. याआधीच्या म्हणजे २०२३ साली झालेल्या १९ वर्षाखालील महिलांच्या टी २० विश्र्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी इंग्लंडचा पराभव करून विश्र्वविजेतेपद मिळवले होते. सलग दोनदा विश्र्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारताच्या या १९ वर्षाखालील मुलींची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे. विशेष म्हणजे भारताच्या वरिष्ठ महिला संघाला अजूनही अशी कामगिरी करता आलेली नाही . भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्र्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या संघाला विश्र्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते मात्र भारताच्या या युवा महिला खेळाडूंनी ही अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वानाच चकित केले आहे. भारताच्या या १९ वर्षाखालील महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या युवा महिला खेळाडूंच्या या कामगिरीचा देशातील १४४ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच निक्की प्रसादच्या या संघाने करून दाखवले आहे. सलग दुसऱ्यांदा टी २० चा विश्र्वचषक जिंकून भारताच्या या युवा महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या युवा खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या वरिष्ठ महिला संघाने देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात अजूनही गांभीर्याने घेतली जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. सलग दुसऱ्यांदा टी २० च्या विश्र्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या १९ वर्षाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! जय हो!!

## अंकिता वालावलकरने घेतली राज ठाकरेंची भेट, शिवतीर्थावर जाऊन दिलं लग्नाचं निमंत्रण



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बिग बॉसमधून बाहेर पडल्यापासून कोकण हार्टेड गर्ल म्हणजेच अंकिता वालावलकरची लग्नघाई सुरू आहे. ती सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्या लग्नाचे अपडेट देत असते. तिनं लग्नपत्रिकेचा फोटोही स्टोरीवर शेअर केला होता. आता ती लग्नाची पत्रिका वाटण्यात बिझी आहे. अनेक कलाकार मित्रांना पत्रिकेचे वाटप केल्यानंतर अंकिता होणाऱ्या नवऱ्यासोबत राज ठाकरेंच्या घरी पोहोचली. अंकिताने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाही लग्नाचे निमंत्रण दिले आहे.

कोकण हार्टेड गर्ल अंकिता वालावलकर होणाऱ्या नवऱ्यासोबत पत्रिका घेऊन राज ठाकरेंच्या घरी पोहोचली. तिनं राज ठाकरे यांना लग्नासाठी खास निमंत्रण दिले आहे. या भेटीचा फोटोही तिने इंस्टा स्टोरीवर शेअर केला होता. शिवतीर्थावर जाऊन तिने राज ठाकरे आणि पत्नी शर्मिला ठाकरे यांची भेट घेतली. लग्नाची पत्रिका दिली.

अंकिता वालावलकरच्या लग्नाची तयारी एकदम जोरात सुरू आहे. ती सोशल मीडियावर आणि युट्यूबवर लग्नाची अपडेट देत असते. मात्र अद्याप लग्नाची तारीख तिने सांगितलेली नाहीये. चाहते तिच्या लग्नासाठी फार उत्सुक आहेत. अंकिताचा होणारा नवरा कुणाल भगत हा गायक, लेखक आणि संगीत दिग्दर्शक आहे. अंकिता वालावलकर ही एक सोशल मीडिया सेन्सेशन आणि बिझनेस वुमनही आहे. बिग बॉस मराठी ५ ने तिची लोकप्रियता आणखीनच वाढवली. बिग बॉसमध्ये गेल्यावर ती कोकण हार्टेडची महाराष्ट्र हार्टेड गर्ल झाली.

## राज्यातील ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने शाळा सर्वेक्षणाचा (ग्रामीण) अहवाल (असर) प्रकाशित केलेला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत 'असर' अहवालाबाबत काही मुद्दे स्पष्ट करण्यात आले आहेत. संस्थेने २०.४ टक्के विद्यार्थ्यांकडून संगणकाचा वापर होत असल्याचे अहवालामध्ये म्हटले आहे. तथापि, एकूण १,०८,१४४ शाळांचा विचार करता संगणकाचा वापर करण्याचे प्रमाण ७२.९५ टक्के इतके आहे.

सदर संस्थेने ४८.३ टक्के शाळांमध्ये संगणक नसल्याचे नमूद केले आहे. वास्तविकत: एकूण शाळांपैकी ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक सुविधा उपलब्ध आहे. मुलींकरिता साधारणत: ९६.८ टक्के इतक्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची उपलब्धता असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. प्रथम या संस्थेने ४०९ प्राथमिक व ४६३ उच्च प्राथमिक व त्यावरील अशा ग्रामीण भागातील एकूण ८७२ शाळांचे सर्वेक्षण केले आहे. युडायस (ळघएए) डाटा सन २०२३-२४ अनुसार राज्यामध्ये एकूण १,०८,१४४ शाळा आहेत. प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने एकूण शाळांच्या केवळ ०.८१ टक्के इतक्या शाळांचेच सर्वेक्षण केलेले आहे.

## एकनाथ शिंदेंच्या गोटात फडणवीसांचे २५ आमदार, राऊतांचा खळबळजनक दावा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** आश्वासन देऊनही भाजपने निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपद न दिल्याने एकनाथ शिंदे म नाने कोलमडले असल्याचा गौप्यस्फोट शिंदेंच्या आम दाराच्या हवाल्याने केल्यानंतर संजय राऊत यांनी आणखी एक गौप्यस्फोट केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या गटात मुख्यमंत्री फडणवीस यांचे २० ते २५ आमदार असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले तरी सत्ता वाटपाचा घोळ सुरू होता. महायुतीचे सरकार असले तरी सगळं काही आलबेल असल्याची चर्चा दबक्या आवाजात राजकीय वर्तुळात सुरू आहे. अशातच शिवसेना ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी शिंदे गटातील आमदाराच्या हवाल्याने मोठा गौप्यस्फोट केला. आश्वासन देऊनही भाजपने निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपद न दिल्याने एकनाथ शिंदे मनाने कोलमडले असल्याचे संजय राऊतांनी आमदाराच्या हवाल्याने सांगितले.

शिवसेना ठाकरे गटाचे म ुखपत्र असलेल्या रोखठोक या सदरात संजय राऊत यांनी हा गौप्यस्फोट केला आहे. 'बहुमत असून राज्य अस्थिर' असा लेख संजय राऊत यांनी लिहिला आहे. आज सकाळी माध्यमांशी संवाद साधतानाही राऊत यांनी आणखी एक खळबळजनक दावा केला आहे.

संजय राऊत यांनी माध्यम ांशी बोलताना सांगितले की, एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपद मिळून देखील अजूनही शून्यात असून धक्क्यात आहे. एक तर निवडणुकीत ५०-५५ जागा कशा मिळाल्या हा त्यांना पहिला धक्का आणि भाजपने, अमित शाह यांनी दिलेला शब्द पाळला नाही हा दुसरा धक्का असल्याचे राऊत यांनी सांगितले. या धक्क्यातून शिंदे कोलमडले असून त्यांची सरकारमध्ये कोंडी झाली आहे.

संजय राऊत यांनी पुढे म्हटले की, मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्यावर एक झोत होता. तो आता गेला आहे. लोक त्यांच्याकडे जात नाहीत. लोक फक्त पैसे मागायला जातात. यापुढील त्यांचे राजकारण पैसा आणि सत्ता जे आहे त्याच्यावर असून त्यांच्याच आमदारांमध्ये चलबिचल असल्याचे राऊतांनी सांगितले.

एका मोठ्या गटावर देवेंद्र फडणवीस यांचे पूर्णपणे नियंत्रण असल्याचा दावा संजय राऊतांनी केला. शिंदे गटाच्या किमान २० ते २५ आमदारांच्या गटावर भाजपचे नियंत्रण आहे. हे आमदार फडणवीस किंवा अमित शाह यांच्या सांगण्यावरून सूरतला गेले होते. एकनाथ शिंदे यांच्यासाठी नव्हते गेले. आजही या गटावर फडणवीस यांचे नियंत्रण आहे. तर, उरलेल्या आमदारांमध्ये चलबिचल आहे. आपण पुन्हा मागे फिरायचे का असा एक विचार शिंदे गटात सुरू असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग, गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ शांततेत

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पूर्व परीक्षेसाठी एकुण १६ हजार २२४ दाखल अर्जापैकी १३ हजार ८९५ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षेस उपस्थिती दर्शविली तर २ हजार ३२९ विद्यार्थी हे परीक्षेस गैरहजर होते. या परीक्षेच्या कालावधीमध्ये कोणताही गैर व अनुचित प्रकार कोणत्याही उपकेंद्रावर घडलेला नाही. महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ परीक्षा ही जिल्ह्यातील ५३ उपकेंद्रावर शांततेत पार पडली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांनी दिली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ही परीक्षा रविवार दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ या एका सत्रात जिल्ह्यातील एकूण ५३ उपकेंद्रावर आयोजित करण्यात आली होती. ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पुढीलप्रमाणे नेमणुक करण्यात आली होती. यामध्ये प्रश्नप्रत्रिका व उत्तरपत्रिका केंद्रावर पोहचविण्याबाबत समन्वय अधिकारी १४ अधिकारीसह २८ सहायक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती.

पान १ वरून...

## पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरी

गेले पाच दिवस स्पर्धेच्या भव्य आयोजनाचा आनंद राज्याच्या जनतेला घेता आला. यापुढेदेखील या स्पर्धेचे आयोजन करतांना या स्पर्धेचे दिमाखदार आयोजनाचे आव्हान आयोजकांसमोर असेल. खेळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासनदेखील प्रयत्नशील आहे. प्रत्येक खेळाच्या विकासासाठी राज्य शासन सहकार्य करेल आणि अहिल्यानगरच्या क्रीडा विकासासाठीदेखील आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे भव्य आयोजन झाल्याचे नमूद करून केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, ही मानाची स्पर्धा आहे. स्व.मामासाहेब मोहोळ यांनी या स्पर्धेला सुरूवात केली. त्यानंतर राज्यात कुस्तीच्या वैभवात भर पडून ही परंपरा आणखी पुढे जात आहे. महाराष्ट्र कुस्तीची पंढरी आहे. राज्याने देशाला अनेक मल्ल दिले. महाराष्ट्राच्या तीन मल्लांना शासनाने वर्ग एक दर्जाच्या पदावर नियुक्ती दिली आहे. येत्या काळातही कुस्तीला राजाश्रय मिळेल असा विश्र्वास व्यक्त करून राज्याची ही परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कुस्ती खेळाला डोपींगसारख्या प्रकाराने गालबोट लागू नये यासाठी येत्या काळात अधिक प्रयत्न होतील असे त्यांनी सांगितले.

विधान परिषदेचे सभापती प्रा.शिंदे यांनी जिल्ह्यात महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाला धन्यवाद दिले. कुस्तीप्रेमी जनता चांगल्या खेळालाच प्रोत्साहन देते असे सांगून त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र केसरी स्पर्धा अहिल्यानगर वासियांसाठी मोठी पर्वणी आहे. वाडिया पार्कचे मोठ्या स्टेडिअममध्ये रुपांतर करायचे आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला चालना मिळेल असे सांगून त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या उत्तम आयोजनाबद्दल संयोजकांचे अभिनंदन करून क्रीडा मंत्री भरणे म्हणाले, २००५ मध्ये अहिल्यानगरमध्ये 'हिंद केसरी' स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. राज्याला कुस्तीची गौरवशाली परंपरा आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याने मल्ल दिले आहेत. अहिल्यानगरच्या क्रीडा विकासासाठी शासनाकडून आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात आमदार जगताप यांनी कुस्ती स्पर्धेविषयी माहिती दिली. लाल मातीच्या खेळातून संस्कार होत असल्याने राज्यभरात या खेळाचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कुस्ती स्पर्धेमुळे अहिल्यानगरचे नाव प्राधान्याने घेतले जाईल असे ते म्हणाले.

माजी आमदार अरुण जगताप, पद्मश्री पोपट पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी खासदार सुजय विखे पाटील, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, सरचिटणीस हिंदकेसरी पै. योगेश दोडके, चित्रपट दिग्दर्शक प्रविण तरडे, जिल्हा कुस्तीगीर कार्याध्यक्ष संघाचे संतोष भुजबळ आदी उपस्थित होते.

## फलटणमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीला

संजीवराजे निंबाळकर यापूर्वी भेटून गेलेले आहेत - आदिती तटकरे

दरम्यान, संजीव राजे यांच्या प्रवेशाबाबत आदिती तटकरे यांनी भाष्य केलंय. संजीवराजे निंबाळकर यापूर्वी भेटून गेलेले आहेत... याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल... कांद्यापासून बांद्यापर्यंत इनकमिंग होईल, अशी प्रतिक्रिया मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केली आहे.

विधानसभा निवडणुकीत फलटणमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा पराभव

फलटण विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. फलटणमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सचिन पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने दीपक चव्हाण यांना मैदानात उतरवले होते. मात्र, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार दीपक चव्हाण यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. सचिन पाटील यांना १ लाख १९ हजार मते मिळाली होती, तर दीपक चव्हाण यांना १ लाख २ हजार मतांवर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे दीपक चव्हाण यांचा जवळपास १७ हजार मतांनी पराभव झाला होता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मराठी माणसाचे अस्तित्व शहरात असावे : राज ठाकरे

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मराठी माणसाचे अस्तित्व शहरात असावे, मराठी माणसाचे अस्तित्व टिकविले पाहिजे,असे मत व्यक्त करून मराठी भाषेसाठी उदय जी तुम्हाला मदत होईल, पण उदय जी गोष्ट आम्ही करू त्याला तुम्ही आम्हाला पाठिंबा द्या, तेव्हा केसेस टाकू नका,अशी कोपरखळी राज ठाकरे यांनी पुणे येपुणे येथे सुरू असलेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनातून सरकारला मारली.

पुणे येथील मराठी साहित्य संमेलनात बोलताना राज ठाकरे म्हणाले की, अस्तित्व टिकले तर भाषा टिकणार आहे. मराठी भाषा टिकविण्यासाठी मराठी माणसाने पुढाकार घेण्याची गरज आहे. उदय सामंत यांनी मला गळ घातली, लोकांना पुरस्कार मिळाला, आम्हाला मात्र तिरस्कार मिळतात. आपण आपल्या भाषेवर ठाम राहिले पाहिजे,तरच तुम्हाला जग किंमत देते. आपली मुलं एकमेकांना बोलताना हिंदीमध्ये बोलतात. जय जय महाराष्ट्र माझा असं म्हणता, कुठल्या राज्याचे असे गीत आहे का? हिंद प्रांतावर मराठ्यांनी राज्य केले. इतर कोणी ही राज्य केलेले नाही, बाकीचे बाहेरून आले.जे राज्यकर्ते होते त्याची भाषा आपण वृद्धिंगत करायची नाही का असा प्रश्न यावेळी त्यांनी उपस्थित केला.

मराठी भाषेसाठी उदयजी तुम्हाला मदत होईल,पण उदयजी जी गोष्ट आम्ही करू त्याला तुम्ही आम्हाला पाठिंबा द्या, तेव्हा केसेस टाकू नका, असा चिमटा त्यांनी घेतला. मराठी माणसाचे अस्तित्व शहरात असावे,ते राज्य सरकारने टिकविले पाहिजे. आमची लोकं आमच्या राज्यात बेघर होणार असतील तर, त्याला विकास म्हणत नाही. हिमाचल प्रदेशमध्ये तुम्ही जर गेला तर तिथे तुम्हाला जमीन विकत घेता येत नाही, भारतीय असून सुद्धा पण आमच्याकडे तुम्ही या आमची जमीन घेऊन जा,असा प्रकार सुरू आहे. तुमचे अस्तित्व टिकले नाही तर, भाषा कधी टिकेल हा प्रश्न आहे. मराठी माणसाने अस्तित्व टिकविले पाहिजे, पुस्तकं नवीन मुलांनी वाचवली पाहिजे, साहित्यिकांनी विनंती आहे. तुम्ही मार्ग दाखवायला पाहिजे. साहित्यिक राजकीय मत मांडायचे, आता मला ते दिसत नाही, चांगलं काय वाईट काय समाजाला सांगितले पाहिजे.

नुसती पुस्तकं वाचली जाणार नाही, वाचन कमी झाले आहे, जे काय येतं ते व्हॉट्सप वर येतंय त्यामुळे वाचन अत्यंत कमी झाले आहे. वाचन वाढविणे भाषा टिकविण्यासाठी काळाची गरज बनली आहे. तरुणाईने साहित्य वाचले पाहिजे




त्यातून बोध घेतला पाहिजे, संमेलनातून जेव्हा बाहेर पडाल तेव्हा १० पुस्तकं जाऊन आणली पाहिजे, जिथे जिथे मराठी, महाराष्ट्र जपता येईल तिथे ते जपा असे आवाहनही ठाकरे यांनी केले.

रितेश देशमुख छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत एक चित्रपट घेऊन येतायत. आता छत्रपती संभाजी महाराजांचा नवीन चित्रपट येतोय, आपल्या महापुरुषांना जातीपातीमध्ये अडकवले नाही पाहिजे. प्रत्येक महापुरुष आपलाच पाहिजे, जातीपातीतून महाराष्ट्र बाहेर येण्याची गरज आहे. असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

## संक्षिप्त...

### श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त आकर्षक फुलांची सजावट






दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** वसंत पंचमीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचा शाही विवाह सोहळा संपन्न होत असून त्यानिमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली जिप्सी, डिजी, सुर्यफुल, गुलाब, रेड गुलाब, पांढरा गुलाब, पिंक गुलाब, पिवळा गुलाब, जरबरा, ऑर्किड जिनेयिम, तगर, गुलछडी, कामिनी, तुक्स, गोंडा (लाल पिवळा) बिजली, अस्टर, शेवंती, पासली, काडी, गिलाडो, डीर्शना इत्यादी सुमारे साडेतीन ते चार टन फुलांचा आणि १ टन ऊसाचा वापर करण्यात आला आहे. श्रींचा गाभारा, विठ्ठल सभामंडप, श्री संत नामदेव महाराज पायरी, उत्तर द्वार (VIP Gate), सोळखांबी, रुक्मिणी सभामंडप, मिरवणूक रथ या ठिकाणी सजावट करण्यात आली आहे. याकरिता सुमारे १०० स्वयंसेवकानी परिश्रम घेतले असून, सदरची सजावट पुणे येथील भाविक भारत भुजबळ यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.

### जीबीएस आजाराच्या संदर्भात आमदार प्रा चंद्रकांत सोनवणे यांनी आरोग्य विभागाला दिल्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** राज्यभरामध्ये काही ठिकाणी जीबीएस चे रुग्ण व संशयित रुग्ण आढळल्याने संपूर्ण आरोग्य विभाग अलर्ट झालेले आहे या जीबीएसचा रुग्ण जळगावला देखील आढळल्याने जळगाव जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा अलर्ट झालेली आहे. प्रशासना चे अधिकारी यांनी देखील आढावा बैठक घेतली सिव्हिल मध्ये आधी ७ बेडच खउण होत आता १८ बेडच्या आयसीयू चं काम अंतिम तप्प्यात आहे लवकरच त्याच लोकार्पण करणार आहोत तसेच सिव्हिल येथे माजी आमदार लता सोणावणे यांनी १०० बेडच्या एवजी २०० बेडच रूग्णालय मंजूर करुन आणल आहे लवकरच त्या २०० बेडच कामही सुरू होणार आहे. चोपडा मतदारसंघाचे आमदार प्रा चंद्रकांत सोनवणे यांनी उपजिल्हा रुग्णालयाचे अध्यक्ष डॉक्टर सुरेश पाटील यांना जीबीएस आजाराच्या पार्श्र्वभूमीवर सूचना दिले आहेत तसेच उपजिल्हा रुग्णालयातील यंत्रणा सतर्क राहण्याच्या सूचना केले आहेत नागरिकांनी देखील काळजी घ्यावी अशी आव्हान केले आहे या आजाराचा फैलाव होऊ नये यासाठी शिवसैनिकांच्या माध्यमातून जनजागृती देखील करण्यात येणार असल्याचे आमदार चंद्रकांत सोनवणे यांनी सांगितले.



### भगवानगडानंतर देशमुख कुटुंब नारायण गडावर





दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** भगवानगडानंतर देशमुख कुटुंब बीड मधील नारायण गडावर दाखल झाले. नगद नारायणाच्या चरणी नतमस्तक होऊन देशमुख कुटुंबियांनी दर्शन घेतले आहे. आज भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांची भेट घेऊन धनंजय देशमुख यांनी काही पुरावे नामदेव शास्त्री यांच्यासमोर सादर केले.

त्यानंतर धनंजय देशमुख यांच्यासह वैभवी देशमुख आणि मस्साजोगचे ग्रामस्थ नारायणगडावर दाखल झाले. कोणालाही पाठीशी न घालता आम्हाला न्याय हवा अशी मागणी यावेळी देशमुख कुटुंबियांनी केली आहे.

## गडचिरोलीमध्ये माओवादी निराश झालेला आहे; माओवादी शेवटची घटका मोजत आहेत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** माओवादी शेवटची घटका मोजत आहेत.माजी सभापतींची निराशेतूनच हत्या केली आहे.त्यावर निश्र्चित कारवाई करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.ज्या ठिकाणी कागद माओवाद्यांनी ठेवला. त्या ठिकाणी पोलिसांचा खबऱ्या असल्याबद्दल त्यांच्यावर आरोप झालेला आहे. यासंदर्भात पोलीस काम करीत आहेत. साधारणपणे कोणी केला असेल, याचा अंदाज त्यातून येत आहे. आणि निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई केली जाईल. आज गडचिरोली मध्ये एक प्रकारे माओवादी निराश झालेले आहेत. कारण



सातत्याने माओवादी आत्मसर्पण करत आहेत. प्रकारे शेवटच्या घटका हा माओवाद मोजतो आहे. निराशेतूनच केलेली ती हत्या दिसत आहे. पण ही हत्या करणाऱ्यांना महिनाभरात विचारायचा किंवा त्यांच्यावर कारवाई करायची अशाप्रकारे पोलिसांनी निर्णय केलेला आहे. कारवाई निश्र्चित होईल.असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## स्वयं विकासाच्या माध्यमातून मुलुंड मधील आर्यवर्त इंद्रप्रस्थ सोसायटीचा पुनर्विकास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वयं विकासाच्या माध्यमातून मुलुंड मधील आर्यवर्त इंद्रप्रस्थ सोसायटीजतचा पुनर्विकास करण्यात आला आज या इमारतीतील रहिवाशांना वाटप मुंबई उपनगराचे पालकमंत्री आशिष शेलार तसेच मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी पालकमंत्री आशिष शेलार यांनी. स्वयंविकासाच्या माध्यमातून पुनर्विकास करणाऱ्या



गृहनिर्माण सोसायट्यांना तंटामुक्त सोसायटी चा पुरस्कार देत एक लाख रुपयांचं बक्षीस देणार असल्याची घोषणा केली. सोबतच स्वयंविकासाचा आड येणारे अडथळे दूर करण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एक बैठक घेऊन स्वयंविकास जलद गतीने करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी प्रवीण दरेकर यांच्या कडून सांगण्यात आलं.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत तटरक्षक दलाचा ४९ वा स्थापना दिन उत्साहात

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय तटरक्षक दलाचा ४९ वा स्थापना दिवस मुंबई येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी तटरक्षक दलाच्या विस्तार योजनेचे कौतुक करताना १५१ हून अधिक जहाजे, ७८ विमान आणि ४६ प्रगत रडार स्थानकांसह, भारतीय तटरक्षक दल जगातील चौथ्या क्रमांकाचे सर्वात मोठे तटरक्षक दल झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

## 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचा धमाल टिझर भेटीला!





**मुंबई/प्रतिनिधी :** रियुनियन म्हणजे धमाल मस्ती. अशाच जबरदस्त बॅकबेंचर्स मित्रांच्या रियुनियनचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात 'इकडे आड तिकडे विहीर','आगीतून फुफाट्यात','धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय', 'बुडत्याचा पाय खोलात', 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणींतून या बॅकबेंचर्सची मजेशीर ओळख ही करून देण्यात आली आहे. या म्हणींची भानगड आणि त्यामागची गंमत हे सगळं जाणून घ्यायचं असेल तर २८ फेब्रुवारीला चित्रपटगृहात येणारा 'चिकी चिकी बुबूम बुम' हा चित्रपट तुम्हाला पहावा लागेल.

शीर्षकापासून आपलं वेगळंपण अधोरेखित करणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटाचं काही दिवसांपूर्वीच एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. या पोस्टरवरून चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यातच आता चित्रपटाचा धमाल टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टिझरमध्ये दिसणारा पार्टीतला गोंधळ आणि सोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, प्रभाकर मोरे अशा कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काहीतरी धमाल घडवणार हे दाखवतोय. यासोबतच नम्रता संभेराव,वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, चेतना भट, ,निखिल बने, श्याम राजपूत, श्र्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे, ऐश्र्वर्या बडदे हे कलाकारही चित्रपटात धमाल आणणार आहेत.

नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत. चित्रपटाचे लेखन प्रथमेश शिवलकर, प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. छायांकन गणेश उतेकर यांचे तर संगीत रोहन रोहन यांचे आहे. धमाल मस्तीचा 'चिकी चिकी बुबूम बुम' प्रेक्षकांसाठी एक वेगळीच ट्रीट असणार आहे.

## स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त चषक राज्यस्तरीय टेनिस बॉल स्पर्धेत, कमल वॉरियरस संघ ठरला विजेता



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आमदार चषक राज्यस्तरीय टेनिस बॉल स्पर्धेचे २३ तारखेला संत श्री बलविंदर सिंघ बाबा यांच्या हस्ते उद्धघाटन करण्यात आले होते. ही स्पर्धा जवळपास अकरा दिवस चाली असुन यात आज या स्पर्धेचा अंतिम सामना कमल वॉरियरस व मकासुरे ऐलेव्हन भुसावळ या दोन्ही संघात होवून यात कमल वॉरियरस हा संघ विजेता ठरला असून प्रथम बक्षिस एक लाख रूपयांचा मानकरी ठरला आहे.

यावेळी आ.आनंद पाटील बोढारकर यांच्या प्रमूख उपस्थितीत बक्षिस वितरण करण्यात आले

स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक नामवंत संघ सहभागी झाले होते. आले यावेळी दक्षिणचे शिवसेना महनगर प्रमुख अशोक उमरेकर ,शहर प्रमुख तुलजेश यादव यांची उपस्थिती होती या स्पर्धे साठी उपशहर प्रमुख स्वराज यादव ,कन्हैया राठोड यांच्या अथक परिश्रमातून होत आहेत.

## ऑनलाइन फ्रॉड करणाऱ्या टोळीस अटक; नऊ मोबाईल, बारा डेबिट कार्ड, १७ चेक बुक हस्तगत करण्यात पोलिसांना यश

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील फातिमा नगर येथे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली होती काही इसम वेगवेगळ्या लोकांच्या नावाने बँक खाते खोलून ऑनलाइन फ्रॉड करून त्यांचे बँक खात्यात पैसे आल्यानंतर पैसे काढून लोकांची फसवणून करत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी १)अब्दुल रब अब्दुल अहाद अन्सारी २३ वर्ष , २)आतिक अहमद वय वर्ष २० राहणार शांतीनगर , ३)सैफ सलीम अन्सारी १७ वर्ष ,४) मोहम्मद बशर जकी



उल्ला अन्सारी २० वर्ष , ५)मोहम्मद जैद अन्सार अन्सारी १७ वर्ष यांच्याकडून १२ मोबाईल वेगवेगळ्या बँकेचे १२ डेबिट कार्ड,१७ चेक बुक एक पासबुक, दोन पॅन कार्ड असे एकूण ७० हजार रुपयांचा किमतीचा मुद्द्यामाल त्यांच्याकडून ताब्यात घेतला असून वरील बँक खात्याची माहिती प्राप्त करून आंतरराष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल चेक केले असता आरोपींकडून मिळालेले भारतातील वेगवेगळ्या शहरात मधील, देहेरी पोलीस स्टेशन बिहार राज्य, तामिळनाडू कोईमतुर सिटी, तामिळनाडू, भिवडी पोलीस स्टेशन राजस्थान, नारायणपुरा पोलीस स्टेशन अहमदाबाद, हिन्नूर पोलीस स्टेशन बेंगलोर कर्नाटक या ठिकाणाहून बँक खात्यात ऑनलाईन रक्कम ट्रान्सफर झाल्याचे बँक खाते फ्रीज करण्यात आल्याची माहिती झाल्याने सदरचे इसम हे ऑनलाइन फ्रॉड करणारे ही सम असल्याची खात्री झाल्याने बँक खात्याची पत्रव्यवहार केल्यावर आठ बँक खात्याची माहिती प्राप्त झाली आहे अद्याप होत प्राप्त झालेले बँक स्टेटमेंट नुसार बँक मध्ये सुमारे ३५ लाख रुपये रक्कम वर्ग झाली असून सदरची रक्कम वर्ग झाल्यानंतर तात्काळ बँक खात्यातून काढून घेतल्याचे निष्पन्न झाले असून उर्वरित बँक खात्याची माहिती प्राप्त करीत असून गुन्ह्याचा तपास शांतीनगर पोलीस स्टेशन करत आहे.

# जलजीवन मिशनचे माहिती फलक झाले अदृश्य




वाशिम जिल्ह्यात लागलेले जलजीवन मिशनचे...

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी मिळावे, यासाठी शासनाच्या वतीने कोट्यावधी रुपयाचा खर्च करून गावागावात जलजीवन मिशनतंर्गत कामे सुरू केली आहेत. मात्र, सदर कामे हे फलकाविनाच केली जात असल्याने नागरिक संभ्रमात पडले आहेत. फलक अदृश्य तर, अधिकाऱ्याचे दुर्लक्ष अशी स्थिती प्रत्येक गावात दिसून येत असल्याने जल जीवन मिशनच्या कामात मोठे गौडबंगाल सुरू असल्याची चर्चा संपूर्ण तालुक्यात होते.**

## ■ पदधिकारी अधिकाऱ्याचे फलकाकडे दुर्लक्ष : नागरिकही संभ्रमात
## ■ लोकप्रतिनिधी या गंभीर बाबीकडे लक्ष देणार

### संबंधित गंभीर प्रकरणाकडे लोकप्रतिनिधी लक्ष देणार का..?

आताच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये अतिशय अभ्यासू प्रशासकीय यंत्रणामध्ये राहिलेले व्यक्तिमत्व आमदार सिद्धार्थ खरात यांना प्रशासकीय यंत्रणेचा चांगलाच अनुभव आहे अशातच ते तालुक्यात चालू असलेल्या जलजीवन मिशन मध्ये लक्ष देणार का..? व मतदार संघातील जनतेला जल जीवन चे पाणी मिळून देणार..? मतदार संघातील जनतेची मोठी अपेक्षा आमदार खरात यांच्याकडून असल्याची चर्चा आता चांगलीच रंगत आहे.

### मेहकर तालुक्यात नियमाला ठेंगा

बुलढाणा जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मेहकर अंतर्गत मेहकर तालुक्यातील तब्बल ९२ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यवधी रुपयाचे कामे केली जात आहेत. मात्र, मेहकर तालुक्यात नियमाला ठेंगा दाखवीत जलजीवन मिशनच्या कामाबाबत मनमानी सुरू असल्याचे चित्र आहे. मेहकर तालुक्याच्या शेजारी असलेल्या रिसोड तालुक्यातील सुरू असलेल्या जल जीवन मिशनच्या कामावर संपूर्ण माहिती फलक लावण्यात आले आहे. तर, मेहकर तालुक्यातील जल जीवन मिशनच्या कामावर माहिती फलक का लावण्यात आली नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे .अवघ्या काही किलोमीटर अंतराच्या अंतरावर जल जीवन मिशनच्या कामावर संपूर्ण माहिती फलक लावलेली आहे. तर मेहकर तालुक्यात केवळ लोकप्रतिनिधीचा वाहवा करण्यासाठी त्यांचे नाव व एकंदरीत रक्कम असा उल्लेख करून करून जनतेची दिशाभूल करण्याचे काम सुरू असल्याचे मेहकर तालुक्यात दिसून येत आहे..

मेहकर तालुक्यामध्ये एकूण ९८ ग्रामपंचायती आहेत. यातील ९२ ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशनचे काम सुरू करण्यात आले आहे. प्रत्येक गावात आणि गावातील प्रत्येक व्यक्तीला शुद्ध व मुबलक पाणी मिळावे, आरोग्याच्या दृष्टीने असलेल्या समस्या कमी व्हाव्यात. या दृष्टिकोनातून शासनाने उदात्ततूने कोट्यवधी रुपयाचा खर्च प्रत्येक ग्रामपंचायतवर करत जल जीवन मिशन अंतर्गत कामाला प्रारंभ केला आहे. जनजीवन मिशनचे काम आहे हे तब्बल १ ते २० कोटी रुपयापर्यंत ग्रामपंचायती अंतर्गत केले जात आहे.

मात्र,सदर काम हे ग्रामपंचायत क्षेत्रात केले जात असताना कुठेही कामाचे संपूर्ण वर्णन केलेले फलक लावण्यात आले असल्याचे दिसून येत नाही. तब्बल कोट्यवधी रुपयाचे काम असताना कामाचे फलक का लावण्यात आले नाहीत. याबाबत मात्र, चर्चे ला उधाण आले आहे.कोट्यवधीचे काम असताना संबंधित अधिकाऱ्यांचा याकडे काळजीपूर्वक लक्ष असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वेळेत सदर काम पूर्ण होऊन नागरिकांना पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी ही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यावर आहे,असे असताना या कामाकडे संबंधित विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने कंत्राटदार मात्र, मनमानी करत काम करीत असल्याचे चित्र मतदार संघात तालुक्यात दिसून येत आहे.



जलजीवन मिशनच्या कामावर फलक न लावण्यात आल्याने या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असल्याची चर्चाही संपूर्ण तालुक्यात होत आहे.अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष पदाधिकाऱ्याचे डोळेझाक यामुळे जलजीवन मिशनच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात मनमानी सुरू असल्याचे संपूर्ण तालुक्यात चित्र दिसून येत आहे. मेहकर तालुक्यामध्ये मधील ९८ ग्रामपंचायतींपैकी ९२ ग्रामपंचायतीमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत कामे केली जाते. जवळपास एका ग्रामपंचायतीमध्ये कोट्यवधी रुपयाची कामे केली जात आहे. असे मतदारसंघात तालुक्यात १०० ते १५० कोटी रुपयांच्यावर कामे सुरू असल्याचा अंदाज आहे. कुठे होती रुपयाचे कामे होत असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे व कंत्राटदराच्या मनमानी कारभाराने जलजीवन मिशनचे कोणतेही काम वेळेत पूर्ण झाले नाही. त्याचबरोबर करण्यात येणारे कामे किती रुपयाचे आहे. किती दिवसांमध्ये पूर्ण होणार, यासाठी निधी किती मिळाला आणि संबंधित काम कोण करणार आदी माहिती फलकावर असणे आवश्यक आहे. असे असताना मात्र, तालुक्यात कोठेही जलजीवन मिशनच्या कामावर माहिती फलक लावण्यात न आल्याने या कामांमध्ये काय गौडबंगाल आहे. याबाबत मात्र संपूर्ण तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

जलजीवन मिशनच्या कामावरील फलक अदृश्य झाल्याने कामाबाबत मात्र, शंकाकुशंका निर्माण होत असून याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनीही लक्ष देऊन सदर काम वेळेत पूर्ण करून गैरप्रकार करणाऱ्या वर कारवाई करावी,अशी मागणी तालुक्यातील नागरिकांकडून होत आहे.

## विविध वृत्त...

### भुमराळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**भुमराळा** : १ फेब्रुवारी रोजी जि.प. प्राथमिक शाळा भुमराळा येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमांमध्ये खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळाला असेल यामध्ये दुमत नाही पण कार्यक्रम संपन्न करण्यामागे असलेल्या शिक्षक वृंदाची भूमिका खरोखर कौतुकास्पद आणि अभिमान वाटावी अशीच आहे त्यामुळे सर्व शिक्षक वृंदाच अगदी मनापासून गावकऱ्यांनी अभिनंदन िकेले कार्यक्रम बघत असताना विविध क्षेत्रातील ऐतिहासिक तसेच राजकीय शिवाय महापुरुषांच्या जीवनातील प्रसंग विविध देवी देवता यांचा भारतीय संस्कृतीला लाभलेला अलौकिक ठेवा विद्यार्थ्यांच्या कलागुणातून निदर्शनास आला. तसेच गावकऱ्यांचा उत्स्फूर्त मिळालेला प्रतिसाद या सांस्कृतिक कार्यक्रमाला एक वेगळा ठसा उमटवून गेला यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष, सर्व सदस्य,ग्रामपंचायत सरपंच संतोष मोरे,उपसरपंच, सदस्य, तसेच तंटा मुक्ती अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य व गावातील सर्व जेष्ठ नागरिक तसेच सर्व गावकरी उपस्थित होते

### विकास कामांच्या नियोजनात स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवा - पालकमंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई/प्रतिनिधी** :जिल्हास्तरावरून अनेक विकासकाम ांचे नियोजन होते, त्याला मंजुरी दिली जाते. निधीही वर्ग केला जातो. या प्रक्रियेत संबंधित तालुक्यातील आमदार व खासदार यांच्याशी समन्वय ठेवून योजनांना मंजुरी द्या. त्यांनी दिलेल्या सूचना प्राधान्याने त्या त्या योजनेत समाविष्ट करा अशा सूचना पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. तसेच कोणतेही नवीन कामांचे प्रस्तावही सादर करताना ते संबंधित लोकप्रतिनिधींना माहित असावेत. आरोग्य व शिक्षण हे दोन घटक विकास प्रक्रियेला बळ देणारे आहेत. सुदृढ व शिक्षति समाज निर्माण करण्यासाठी या दोन घटकांना अधिकचा निधी येत्या काळात देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## जिवंत काडतूस बाळगून शहरात फिरणारा तडीपार आरोपी पोलिसांच्या अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : एक वर्षापासून तडीपार आरोपी देशी कट्टा आणि जिवंत काडतूस बाळगून शहरात फिरत असलेल्या आरोपीला गिट्टीखदान पोलिसांनी अटक केली आहे. मनीष ऊर्फ लक्की पिल्ले असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गिट्टीखदान पोलिसांचे पथक गस्त घालत होते. गिट्टीखदान परिसरात एक तडीपार आरोपी देशी कट्टा घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिस तेथे गेले असता आरोपी लक्की पळून जात होता पोलिसांनी पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. लक्कीची अंगझडती घेतली असता एक देशी बनावटीची रिव्हॉल्व्हर व एक जिवंत काडतूस त्याच्याकडून जप्त करण्यात आली आरोपी काही घातपात करणार होता का याचा तपास सुरू आहे.

### सह-पालकमंत्री माधुरी मिसाळ यांनी घेतले करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शन

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण अल्पसंख्याक विकास, औकाफ राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री माधुरी मिसाळ यांनी श्री अंबाबाई देवीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्या नंतर कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळावर भेट देऊन पुष्प अर्पण केले. यावेळी आमदार शिवाजी पाटील, कोल्हापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त राहूल रोकडे, समाज कल्याण सहायक आयुक्त सचिन साळे, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नायकवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## त्या वटवृक्षाची कत्तल झाल्यास चिपको आंदोलन करू !

### एजाज पटेल यांचा इशारा

### सार्वजनिक बांधकाम अधीक्षक अभियंता यांच्याकडे निवेदन

दैनिक आपला विदर्भ




**उमरखेड/प्रतिनिधी** : ढाणकी नगरपंचायत परिसरात सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत नालीच्या बांधकामांमध्ये येत असलेल्या वट वृक्षाची कतल झाल्यास आंदोलन करू असा इशारा शिवसेना नेते शेख एजाज पटेल यांनी दिला आहे

ढाणकी शहरांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बाळासाहेब ठाकरे चौक ते संविधान चौक पर्यंत चालू असलेल्या नाली खोदकामामध्ये काही वृक्ष येत असल्याने ठेकेदारामार्फत वृक्ष तोडल्या जाऊ शकते व ते वृक्ष तोडू नाही यासाठी अनेकांनी सार्वजनिक बांधकाम कनिष्ठ अभियंता वसंत खसावत यांना विनंती केल्या मात्र त्या रस्त्याच्या कडेला काही वृक्षांची कत्तल झाली आहे यावर कोणती चौकशी झाली नाही चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी व नाली मध्ये येत असलेल्या वृक्षांची कतल केल्यास चिपको आंदोलन करू असा इशारा शिवसेना (उ बा टा) अल्पसंख्यांक उमरखेड तालुका प्रमुख एजाज पटेल यांनी निवेदनाद्वारे अधीक्षक अभियंता चंद्रकांत मेहेत्रे यांना निवेदन व इशारा दिला आहे.

> कोणत्याच वृक्षाची क त्तल होणार नाही व संबंधित अधिकाऱ्यांशी चौकशी करून कारवाई करू
> **-चंद्रकांत मेहेत्रे**
> **अधीक्षक अभियंता**
> **सार्वजनिक बांधकाम मंडळ यवतमाळ**

# जिल्ह्यात ३५ महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रास मान्यता

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात ३५ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यातील उमेदवारांनी या महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तसेच युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे.

**प्रशिक्षण क्षेत्र** : जीएसटी सहाय्यक, सॉफ्टवेअर डेव्हलपर, फिल्ड टेक्निशियन, डाटा एन्ट्री ापरेटर, ईलेक्ट्रीशियन, सोलर पॅनल इन्स्टॉलेशन टेक्निशियन, जनरल ड्यूटी असिस्टंट, मोबाईल हार्डवेयर टेक्निशियन, हॅण्डसेट ण्ड टॅबलेट रिपेअर टेक्निशयन, डिझाईनर मेकॅनिकल इत्यादी पदांच्या कामाचे प्रशिक्षण महाविद्यालयनिहाय आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रात दिले जाणार आहे.

**महाविद्यालयांची नावे** : १. गुंजकर कॉलेज आवार, २.गुरुकुल चित्रकला महाविद्यालय बुलढाणा, ३.गुरुकुल कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी बुलढाणा ,४. के बीजे आयटीआय बोरखेडी, तालुका मोताळा, ५.माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, ६.न्यू सिटीजन टेक्निकल इन्स्टिट्यूट बुलढाणा, ७.प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा, ८.राजीव गांधी आर्ट्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज सिंदखेड राजा, ९.राजमाता वोकेशनल ट्रेनिंग सेंटर, १०.संत गजानन महाराज नर्सिंग स्कूल शेगाव, ११.सावळे आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज लखनवाडा बुद्रुक, १२.स्व. प्रकाश भाऊ बावस्कर महाविद्यालय सावळी, १३.स्वर्गीय दयासागर जी महाले प्रायव्हेट इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट उंद्री, १४.श्रीमती कावेरी देवी केदार माल अग्रवाल आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मलकापूर,१५.राजे छत्रपती कला महाविद्यालय धामणगाव बडे, १६.कुलस्वामिनी ज्युनिअर कॉलेज पिंपळगाव देवी, १७.अनुदानित आदिवासी उच्च माध्यमिक आश्रम शाळा येळगाव, १८.राजे छत्रपती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जयपुर, १९.चक्रधर स्वामी आर्ट जुनियर कॉलेज मढ, २०.पैनगंगा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग येळगाव,२१.स्किल पॅरामेडिकल कॉलेज बुलढाना,२२.राजे छत्रपती ज्युनिअर कॉलेज धामणगाव बढे, २३.खामगाव पॅरामेडिकल कॉलेज खामगाव, २४.छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था बोराखेडी, २५.राष्ट्रमाता तुकडोजी महाराज प्रायव्हेट इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट खामगाव,२६.सहकार महर्षी लेट भास्करराव शिंगणे आर्ट कॉलेज खामगाव, २७.अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली, २८.पी आर एम एस एस अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली, २९.झेड ए उर्दू जुनिअर कॉलेज मलकापूर ३०. विश्र्व कौशल्य अँड एम्पॉवरमेंट प्रायव्हेट इंडस्ट्री ट्रेनिंग बुलढाणा.३१. एसएमटी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज नांदुरा. ३२. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय ३३. श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा, ३४.गावंडे कॉलेज ऑफ फार्मसी साखरखेर्डा,३५. आदिवासी ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स टुनकी बीके या जिल्ह्यातील ३५ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र कार्यान्वित केले जात आहे. जिल्ह्यातील उमेदवारांनी या महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षणासाठी भेट द्वेवून प्रशिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे.